## प्रेसनोट दिनांक १९/०८/२०१९
## पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे
## येरवडा पो.स्टे.चे पोलीसांनी एका गळफास घेतलेल्या तरूणाचे वाचविले प्राण.

---

दिनांक १९/०८/२०१९ रोजी१३ः४५ वा.चे सुमारास महिला,वय २५ वर्षे, रा.येरवडा,पुणे यांनी येरवडा पोलीस ठाणे अंकीत पर्णकुटी चौकी येथे येवुन तिचा नवरा हा कौटुंबिक वादातून मारहाण, शिवीगाळ करीत असलेबाबत तक्रार दिली. पो.उप.निरी.भुषण कोते यांचे सूचनेप्रमाणे सदरचे तक्रारीवरून पर्णकुटी चौकीचे ड्युटी अंमलदार पो.हवा.४१२८,सुनिल जाधव यांनी सदर महिलेची अदखलपात्र गुन्हा रजि.नं.१९८०/२०१९ भा.दं.वि.क.५०४,५०६ प्रमाणे एन.सी. नोंदवून महिलेचा पती हा पुन्हा शिवीगाळ अथवा भांडण-तंटा करू नये म्हणून सीआरपीसी क.१४९ प्रमाणे प्रतिबंधात्मक नोटीस देऊनत यांचे समुपदेशन केले.त्यानंतर सदर महिला व तिचा पती हे त्यांचे घरी निघून गेले.

त्यानंतर दि.१९/०८/२०१९ रोजी दु.०३ः३० वा.चे सुमारास सदर महिला यांनी पर्णकुटी पोलीस चौकीस पुन्हा येवून चौकीचे पो.उप.निरी.भुषण कोते व चौकी अंमलदार पो.हवा.४१२८,सुनिल जाधव, पो.ना. ७६१९, एम.बी.भुजबळ यांना कळविले की, त्यांचा पती याने घरी गेल्यानंतर तिचेशी पुन्हा शिवीगाळ व भांडण करून तिला घरातून हाकलून दिले असून,स्वतः घराचा दरवाजा आतून बंद करून घेतला आहे असे सांगितले. त्यावरून पो.उप.निरी.भुषण कोते, पो.हवा. ४१२८ सुनिल जाधव व पो.ना.७६१९ एम.बी.भुजबळ यांनी तात्काळ पर्णकुटी बीट मार्शलचे पो.कर्मचारी (१)पो.शि.७४१७ तेजस महेंद्र भोसले व (२)पो.शि.१०२८६ कपिल भाऊसाहेब भाकरे यांना सदरची माहिती देऊन तात्काळ सदर महिलेचे घरी जावून काय प्रकार आहे पाहणेस सांगितले. त्याप्रमाणे बीट मार्शलचे (१)पो.शि.७४१७ तेजस भोसले व (२)पो.शि.१०२८६ कपिल भाकरे यांनी विनाविलंब सदर महिलेचे घरी जावून पाहता, घराचा दरवाजा आतून बंद होता. त्यामुळे त्यांनी घराचे खिडकीतून पाहिले असता सदर महिलेचा पती याने घराचे छतास असलेल्या पंख्याला गळफास घेवूनतो लटकलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यामुळे वरील पोलीस कर्मचारी यांनी घराचा दरवाजातोडून आत प्रवेश केला. त्याचे गळफासाची दोरी कापून त्यास खाली उतरविले. त्यावेळी तो बेशुध्द होता परंतु त्याचा श्वासोश्वास सुरू असल्याने वरील कर्मचाऱ्यांनी तात्काळ १०८ क्रमांकावर फोन करून ॲम्ब्युलन्स बोलावून घेवून,सदर इसमास ॲम्ब्युलन्स मधून ससून हॉस्पिटल,पुणे येथे यादीसह पाठविले असता,तेथे सदर इसमावर तातडीने उपचार करण्यात आले असून सदरचा इसम हा सुखरूप असून,त्याचेवर ससून हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत. पोलीसांनी अत्यंत तत्परतेने व कर्तव्य दक्षतेने कारवाई करून त्याचे प्राण वाचविले बाबत त्याची पत्नी व नातेवाईकांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहेत.

अशारितीने येरवडा पोलीस स्टेशनकडील पर्णकुटी चौकीचे पो.उप.निरी.भुषण कोते, चौकी ड्युटी अंमलदार पो.हवा.४१२८ सुनिल जाधव,रायटर पो.ना.७६१९,एम.बी.भुजबळ व पर्णकुटी बीट मार्शलचे (१)पो.शि. ७४१७ तेजस महेंद्र भोसले (२)पो.शि.१०२८६ कपिल भाऊसाहेब भाकरे यांनी सदर महिलेने दिलेल्या माहितीवरून अत्यंत कर्तव्य दक्षतेने व तत्परतेने कारवाई करून गळफास घेतलेले नमूद महिलेचे पती यांचे प्राण वाचवून अत्यंत उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**(युनूस शेख)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे